अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मोदींची मोठी प्रतिमा आणि अपुरी चौकट

नवे सरकार स्थापन झाल्याबरोबर अनेकांना विकासाची, प्रगतीची नवनवीन स्वप्ने पडायला लागली आहेत. नरेंद्र मोदी यांनी स्वत:च आपली प्रतिमा एवढी मोठी करून ठेवली आहे की, त्याला आता चौकट अपुरी पडावी, अशी एकूण परिस्थिती निर्माण झाली आहे. सामान्य लोकांपासून ते अब्जावधींची उलाढाल करणाऱ्या उद्योगजगतापर्यंत अशा अनेकांनी नवे सरकार आल्यानंतर ज्या काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या पाहिल्यावर त्या अपेक्षांच्या नुसत्या ओझ्यानेच नरेंद्र मोदींची दमछाक होईल की काय असे वाटू लागते. एकतर नरेंद्र मोदींनी प्रत्यक्ष कामाची सुरुवात करण्यापूर्वी समारंभाचा धडाका उडविला. शपथविधी समारंभाचा जंगी उत्सव घडवून आपण कसे इतरांपेक्षा आगळेवेगळे आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न केला. तो सगळा उत्सव पाहून अनेकांना आता फक्त मोदीच काय तो देशाचा उद्धार करू शकतात, अशी एकमेव आशा वाटू लागली आहे. अजून त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केलेली नाही. काँग्रेस किंवा यूपीए सरकारपेक्षा काहीतरी वेगळे काम त्यांना करून दाखवावे लागणारच आहे. प्रश्न फक्त एवढाच आहे की, गरिबांचे सरकार किंवा 'सब का साथ सबका विकास' अशी घोषणा देताना योजना मात्र श्रीमंतांसाठीच असतील की काय याचा खुलासा त्यांना आपल्या कामातून करावा लागेल. त्यांनी आपली प्रतिमा तर भली मोठी निर्माण केली आहे. आता त्याला पडदा अपुरा पडू नये अशीच आमची इच्छा आहे. लोकांना, उद्योजकांना काही राजकारण्यांनासुध्दा मोदींविषयी बरीच खात्री वाटत आहे. आता समारंभ तर थोर झाला खरा पण गरिबांचे सरकार म्हणणाऱ्यांनी चांगल्या कामाचा शुभारंभ करावा. अपेक्षांच्या हवेने भरलेले फुगे खूप उंचीवर गेले की, फुटायचे थांबत नाही. तशी वेळ मोदींबाबत फुगवल्या गेलेल्या अपेक्षांच्या फुग्यांबाबत होऊ नये. खरे तर केवळ प्रतिमा निर्माण करण्यावर भर देण्यापेक्षा प्रत्यक्ष कामांमधून लोकांना बोलतं करणं जास्त चांगलं असते. गुजरातमधल्या विकासकामांवर तिथल्या लोकांनी विश्वास व्यक्त केला. परंतु मोदी जेव्हा सर्वप्रथम मुख्यमंत्री झाले तेव्हा सुरुवातीला त्यांनी फार गाजावाजा न करता कामे करायला सुरुवात केली. नंतर झालेल्या गोध्रा दंगलीने त्यांचे नाव जगभर पसरले.

## मोठी कसरत

दुसऱ्यांदा निवडणूक लढताना किंवा जिंकताना त्यांना बरीच कसरत करावी लागली. याच समीकरणाचा विचार केला तर पंतप्रधानपदाच्या या पहिल्याच कारकिर्दीत त्यांना असेच श्रम करावे लागतील. त्यांच्या राज्यात तिथल्या मंत्र्यांना मोदींच्या कामाची सवय झाली होती. केंद्रात अनेक नेते आहेत. राज्यांमध्ये मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असलेले नेते आहेत. अशा सर्वांना सांभाळून म्हणा किंवा मोदींना त्यांच्या कामाची पध्दत दाखवून म्हणा कामाला लावावे लागेल. तर हे भल्या मोठ्या अपेक्षांचं ओझं थोड्याफार प्रमाणात कमी होईल. मोदींनी सुरुवात तरी चांगली केली, फक्त त्यांनी एकाच निर्णयाबाबत अशा प्रकारची घाई का केली त्याचा खुलासा झालेला नाही. प्रमुख सचिवाची नियुक्ती करण्यासाठी त्यांना थेट कायद्यात बदल करणारा अध्यादेश काढण्याची वेळ का आली. एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती कायद्यात बसवण्यासाठी कायद्याची मोडतोड करण्याची गरज होती काय किंवा अगदी प्रचंड वेगाने मंत्रिमंडळाची मंजुरी येऊन अध्यादेश काढण्याइतपत त्यांची तातडी होती का. मुख्य किंवा प्रिन्सिपल सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यासाठी जो काही आटापिटा केला त्याऐवजी त्याच ताकदीचा दुसरा अधिकारी मिळाला नसता का, हे अधिकारी सध्या 'ट्राय'चे म्हणजे दूरसंचार खात्याच्या प्राधिकरणाचे प्रमुख आहेत. त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यायला सांगून त्यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती करता आली नसती का.

## शंभर दिवसांचा टप्पा

'ट्राय'च्या कायद्याप्रमाणे त्यांच्या प्रमुखाला अन्य पदे स्वीकारता येत नाहीत किंवा निवृत्ती अथवा राजीनाम्यानंतर दोन वर्षे कोणतेच पद स्वीकारता येत नाही, असा नियम करताना अनेक गोष्टींचा विचार केला गेला होता. असे असताना केवळ त्या अधिकाऱ्यांसाठी नियमांची मोडतोड करणे कितपत उचित ठरते याचा फार गाजावाजा झाला नाही. कारण नवे सरकार नव्या उत्साहात आहे. लोकांनाही मोदींना त्यांच्या पध्दतीने काय करू दिले पाहिजे. असे वाटते आहे. परंतु याचा अर्थ सुरुवातच अध्यादेशाने किंवा कायद्यात नियमात बदल करण्याच्या प्रकाराने व्हावी हे जरा जास्तच झाले. मोदी किंवा भाजपा यांना ही गोष्ट फारशी महत्त्वाची वाटणार नाही. प्रशासकीय व्यवस्थेसाठी अशा प्रकारे अधिकाऱ्यांची निवड प्रत्येक नवे सरकार करीत असते. असा खुलासा करायला भाजपा मागेपुढे पाहणार नाही. परंतु ही छोटीशी गोष्टसुध्दा लोकांच्या नजरेतून सुटणार नाही. कारण स्वत: मोदींनीच त्यांची तशी प्रतिमा निर्माण केली आहे. साध्या-साध्या किंवा छोट्या छोट्या गोष्टींकडेही लोकांचे लक्ष राहील आणि अशा साध्या गोष्टींबाबतही मोदी तडजोड करतात की, काय असे लोकांना वाटू शकेल म्हणून एकूण आपल्या भारत सरकारचा कारभार, त्याची प्रशासकीय व्यवस्था, राजकीय वातावरण याचा जो एक पायंडा पडला आहे तो मोडून काढणे सोपे नाही. अर्थात कठीणही नाही. मात्र या सर्वांचा विचार केला तर 'प्रत्यक्षाहूनि प्रतिमा उत्कट' या काव्यओळींप्रमाणे मोदींचीही प्रतिमा मोठी झाली आहे.आता यापुढे किमान त्यांनी लोकांच्या अपेक्षा वाढवू नयेत. टप्प्याटप्प्याने एकेक अपेक्षा पूर्ण करावी. त्याची सुरुवात म्हणून त्यांनी दहा गोष्टींची निवड केली आहे. त्यासाठी पुढच्या शंभर दिवसांचा कालावधीही त्यांनी नक्की केला आहे. कामे पूर्ण करण्याची त्यांची ही हातोटी योग्य ठरली तर नक्कीच विकासाचे नवे धोरण राबवायला सुरुवात झाली असे म्हणता येईल. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनीदेखील सत्ता हातात घेतल्यानंतर आपण शंभर दिवसांत महागाई कमी करू, असे आश्वासन दिले होते. महागाई कमी तर झाली नाही पण शंभरपट मात्र वाढली. तसे मोदी यांचे होणार नाही अशीही लोकांना आतापासूनच खात्री वाटते. कदाचित शंभर दिवसांत ते वीस कामेही करून दाखवतील. कारण त्यांनी स्वत:विषयीच्या अपेक्षा लोकांच्या मनात जागवल्या आहेत. त्यांच्या कामाचा धडाका ही त्यांची ओळख ठरणार असल्यामुळे लोकांचे त्यांच्याकडे नेहमीच लक्ष राहील.